(CNRMHSN110005692022)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२४१/२०२२</u>**

**<u>निशाणी २१ लगत</u>**

**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री.व्ही.एस.दाणी यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१५. साक्षीदाराला निशाणी २३/१ सोबत दाखल करण्यात आलेली कराराची छायांकित प्रत दाखविण्यात आली होती. मूळ करार आरोपी विरुध्द माझ्या मुलाने दाखल केलेल्या फिर्यादीमध्ये आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, मुलाची व आरोपीची सही आहे. त्या सह्या मी ओळखतो. (दुय्यम पुराव्याबाबतच्या परिस्थितीचे समाधान होत असल्यामुळे सदर दस्त पुराव्यात वाचता येईल. सबब, त्याला **<u>निशाणी क्र.३१</u>** देण्यात येत आहे.)

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.जी आर.माने यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१६. माझे व्यवसायचे ठिकाण करीम नगर, तेलांगणा येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आटपाडीमध्ये आमचे दुकान नाही. मी जे दागिने दिलेले आहेत त्याचे वर्णन केलेले आहे. मी माझ्या म्हणण्याप्रमाणे दिलेल्या दागिन्यांचा पावत्या हजर केलेल्या नाहीत. साक्षीदार सांगतो की, हजर करु शकतो.

प्रश्न – तुमच्या म्हणण्याप्रमाणे २९,७०,०००/– खात्यावर वर्ग केले याबाबत तक्रार करण्याचा तुम्हाला व्यक्तिगत अधिकार नाही.

उत्तर – आम्ही एकत्र व्यवसाय करतो.

प्रश्न – ते पैसे तुम्ही व्यावसायिक खात्यावरुन हस्तांतरित न करता मुलाच्या खात्यावरुन हस्तांतरित केले आहेत.

उत्तर – आमच्या दोघांचे वयक्तिक खाते आहे.

मी तसा वयक्तिक खात्याचा उतारा दाखल करायला तयार आहे.

प्रश्न – तुम्ही सराफ व्यवसाय करता म्हणल्यावर आजपर्यंत इतक्या रकमचे दागिने किती लोकांना उधार दिले आहेत.
उत्तर – आम्ही उधार देतच नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या म्हणण्याप्रमाणे असणारे दागिने आरोपींना दिलेलेच नाहीत. माझ्या म्हणण्याप्रमाणे ४३,४५,०००/– रोख दिली या करीता मी त्यांच्याकडून लेखी पावती घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने वीस लाखाचा धनादेश दिला नाही.

१८. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेला स्टॅम्प मुलाने विकत आणला होता. साक्षीदाराला निशाणी ३१ वरील दस्त दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तामध्ये रकमेचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर करारात धनादेशाचा क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तात व्याजासह पैसे आरोपीने परत केले पाहिजेत असे मी नमूद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्टॅम्प नोटरी करायला काही हरकत नव्हती. साक्षीदार सांगतो की, विश्वास होता. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश माझ्या मुलाने लिहिला आहे.

१९. साक्षीदाराला निशाणी २४ वरील धनादेश दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरील अक्षर माझ्या मुलाचे आहे. माझ्या फिर्याद मध्ये व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद केल्यानुसार धनादेशावर माझ्या मुलाने केदारनाथ ज्वेलर्स असे नाव लिहिल्याबाबतचा मजकूर चुकीचा आहे. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वाचून दाखल केले. माझ्या सरतपासात मुलाने धनादेशावर नाव लिहिले असा मजकूर चुकीचा पडला आहे. साक्षीदाराला निशाणी २४ वरील धनादेश दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील शाईत बदल आहे.

२०. माझ्या म्हणण्याप्रमाणे आरोपीने दिलेला धनादेश मी दोन वेळा बँकेत भरला. माझ्या म्हणण्याप्रमाणे पहिल्यांदा धनादेश अनादरीत झाल्याबाबतचा मेमो या कामात हजर केलेला आहे. मी त्यावेळेस आरोपीला नोटीस पाठवली नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला २९,७०,०००/– व्याजाने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने व्याजासहीत मला रकमेची परतफेड केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला जे काही पैसे देणार होते ते व्याजापोटी देणार होते.

२२. हे म्हणणे खरे नाही की, तेलांगणामध्ये माझा सराफ व्यवसाय बंद आहे. माझा व्यवसाय सुरु असल्याबाबत मी पुरावा दाखल करु शकतो. तेलांगणामध्ये तेलगु भाषा चालते. हे म्हणणे खरे नाही की, तेलगु भाषेत मी त्या ठिकाणी तक्रार अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी व्याजाच्या व्यवसाया संबंधात मी तक्रारी अर्ज दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून व्याजाची रक्कम वसूल होण्याकरीता मी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून मी २९,७०,०००/– देताना पाच ते सहा कोरे धनादेश सिक्युरिटी म्हणून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला एक कोटी हातउसणे दिले नाहीत म्हणून मी त्याच्या विरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात लिहिलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

आटपाडी (वि. द. पाटील)

दिनांक : ०६/०२/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी